मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडचा विकास आराखडा पुढील आठवड्यात प्रसिद्ध होणार

## चऱ्होली, मोशी, रावेत, किवळे, मामुर्डी, ताथवडे या गावांतील विकासाला संधी : शहरातील 2041 पर्यंतची लोकसंख्या गृहीत धरून नवीन विकास आराखडा तयार केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील २०४१ पर्यंतची लोकसंख्या गृहीत धरून पिंपरी-चिंचवड महापालिकेने नवीन विकास आराखडा तयार केला आहे. हा आराखडा हरकती, सूचनांसाठी पुढील आठवड्यात प्रसिद्ध केला जाणार आहे. त्यावर सुनावणी होऊन आराखडा अंतिम करण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. नवीन आराखड्यात चऱ्होली, मोशी, रावेत, किवळे, मामुर्डी, ताथवडे या समाविष्ट गावांतील विकासाला संधी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



पिंपरी-चिंचवड महापालिकेचा २००२ मध्ये आराखडा तयार करून प्रसिद्ध करण्यात आला होता. त्याला २००८-०९ मध्ये मंजुरी मिळाली. या आराखड्याची मुदत २०२० मध्ये संपली. महापालिकेने नवीन आराखड्यासाठी २०१८ मध्ये इरादा प्रसिद्ध केला. आराखडा तयार करण्यासाठी गुजरातमधील 'एचसीपी' या संस्थेची नियुक्ती केली होती. दहा कोटी रुपयांमध्ये आराखडा तयार करण्यात आला आहे.

संस्थेने संपूर्ण शहरातील मोकळ्या जागांचे भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (जीआयएस) सर्वेक्षण केले. जागांचा प्रत्यक्ष वापर पाहिला. २०४१ पर्यंत शहराची लोकसंख्या किती होईल. लोकसंख्येच्या गरजेनुसार रस्ते, शाळा, उद्याने, रुग्णालयांसह मूलभूत सुविधांची आरक्षणे टाकण्यात आली आहेत. सर्वसाधारण सभेचे अधिकार असलेल्या प्रशासकांची मान्यता घेऊन आराखडा हरकती, सूचनांसाठी महापालिकेचे संकेतस्थळ आणि महापालिकेतील फलकावर प्रसिद्ध केला जाईल.

हरकतींसाठी एक महिन्याची मुदत दिली जाईल. सामाजिक संस्था, शहरातील आणि शहराबाहेरीलही नागरिक हरकत घेऊ शकतील. हरकतींवरील सुनावणीसाठी सात जणांची नियोजन समिती स्थापन केली जाईल. ही समिती योग्य हरकतींची शिफारस करेल. शिफारस स्वीकारण्याबाबतचा अधिकार सर्वसाधारण सभेकडे राहील. त्यानंतर झालेल्या बदलांसह सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने आराखडा शासनाकडे पाठविला जाईल.

### ताथवडेचा विकास आराखडा रद्द

» महापालिकेत ताथवडे गावाचा २००९ मध्ये समावेश झाला आहे. या गावाचा स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्यात आला होता. त्याची मुदत २०३८ पर्यंत होती. परंतु, शहराचा नवीन विकास आराखडा तयार करण्यात आला. त्यामुळे ताथवडेचा आराखडा रद्द करण्यात आला आहे.

### ...तर शासनाकडे अधिकार

» महापालिकेच्या आराखड्याची २०२० मध्येच मुदत संपली. करोना, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता आणि विविध कारणांमुळे महापालिकेने १८ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ घेतली होती. या मुदतीत विकास आराखडा प्रसिद्ध न केल्यास शासनाकडे अधिकार जातील. त्यामुळे १८ मे पर्यंत आराखडा प्रसिद्ध करावा लागणार आहे.

> नवीन विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हरकती, सूचनांसाठी तो पुढील आठवड्यात प्रसिद्ध केला जाईल. सर्व प्रक्रिया होण्यास चार महिन्यांचा कालावधी लागेल
>
> **- प्रसाद गायकवाड, उपसंचालक, नगररचना विभाग**

---

# पिंपरी-चिंचवडमधील होर्डिंगवरील जाहिरातबंदी दोन महिन्यांवरून दोन आठवड्यांवर

## होर्डिंगवरील जाहिरातबंदी दोन आठवड्यांपुरतीच पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडू नये, यासाठी शहरातील सर्व होर्डिंग दोन महिने जाहिरातीविना ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने मागे घेतला असून, आता दोन महिन्यांची मुदत १४ दिवसांवर आणण्यात आली आहे. आता २५ मे ते ७ जून २०२५ या कालावधीतच होर्डिंग जाहिरातीविना ठेवण्यात येणार आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील होर्डिंगधारक आणि महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांची गेल्या नऊ ९



एप्रिल रोजी बैठक झाली. वादळी वारे, अवकाळी पावसामुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यात जीवित व वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे १५ एप्रिल ते १५ जून असे दोन महिने होर्डिंगवर जाहिराती न लावण्याचा निर्णय घेतला होता.

या कालावधीत होर्डिंग रिकामी ठेवली जाणार होती. या निर्णयास होर्डिंगचालकांनी बैठकीत सहमतीही दिली होती. मात्र, तरीही बहुतांश होर्डिंगवर गृहप्रकल्प, राजकीय नेते, विविध कार्यक्रम, वाढदिवसाच्या शुभेच्छा अशा जाहिराती झळकत आहेत. त्यामुळे होर्डिंगचालकांची पुन्हा बैठक घेण्यात आली. त्या वेळी, 'या काळात होर्डिंगवरील जाहिरातीसाठी मोठे उत्पन्न मिळते. त्यामुळे जाहिरात न लावल्यास उत्पन्न बुडते,' असा सूर होर्डिंगधारकांनी आळवला. त्याला सहमती देऊन प्रशासनाने दोन महिन्यांची मुदत १४ दिवसांवर आणली. त्यामुळे आता २५ मे ते ७ जून या १४ दिवसांत होर्डिंगवर जाहिराती न लावता ती रिकामी ठेवली जातील.

> या दोन महिन्यांच्या काळात जाहिरातीद्वारे मोठे उत्पन्न मिळते. त्यामुळे कालावधी कमी करण्याची विनंती होर्डिंगधारकांनी केली. त्यानुसार पावसाळ्यापूर्वीच्या दोन आठवड्यांच्या काळातच होर्डिंग रिकामी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
>
> **- प्रदीप ठेंगल उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# जगाला हेवा वाटेल असे ज्ञानपीठ आळंदीत उभारणार; मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

## आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचविण्यासाठी आळंदी येथे साडेचारशे एकर जागेत जगाला हेवा वाटेल असे संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला हभप शांतीब्रम्ह गु. मारुती महाराज कुरेकर, आमदार उमा खापरे, शंकर जगताप, बाबाजी काळे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएआरडीए'चे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त अॅड. राजेंद्र उमाप, डॉ. भावार्थ देखणे, योगी निरंजन नाथ, अॅड. रोहणी पवार, पुरुषोत्तम पाटील आदी उपस्थित होते.



### जात, पंथ, धर्म विरहित समाज निर्माण करण्याचे संतांचे कार्य

» संत ज्ञानेश्वर माऊलींनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि संत तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढविला. संतांची ही मोठी परंपरा आपल्या देशाला लाभली आहे. जात, पंथ, धर्म विरहित समाज निर्माण करण्याचे कार्य संतांनी केले. वारकरी प्रत्येकात पांडुरंग पाहतो. वारकरी संप्रदायाने रुजविलेल्या परंपरेमुळे राज्य अग्रेसर आहे. देशात परकीय आक्रमण होत असताना भागवत धर्माला जिवंत ठेवण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने आणि संतांनी केले. त्यामुळे आपला विचार, संस्कृती आणि धर्म कोणीही नष्ट करू शकला नाही. परकीय आक्रमणाच्यावेळी संत समाजात सुविचार रुजवत होते. त्यामुळे चांगल्या विचारांची परंपरा आजही सुरू आहे..

ज्ञानपीठ आपल्या हातून व्हावे हे ईश्वराची योजना असावी आणि त्याचे समाधानाही असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, ज्ञानपीठ तयार करण्यासाठी ७०१ कोटी रुपयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ज्ञानपीठाच्या माध्यमातून भारतीय अध्यात्मिक परंपरेतील मानवी कल्याणाचा शाश्वत विचार जगभरात जाईल. पाणीहभप शांतीब्रम्ह गु. मारुती महाराज कुरेकर यांनी भागवत धर्म प्रचारासाठी केलेले कार्य लक्षात घेता यांना पद्म पुरस्कार मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. प्रत्येक गावातील भागवत सप्ताहामुळे हा विचार सर्वदूर पोहोचविण्यास मदत होत आहे. अध्यात्मिक बैठकीशिवाय मनःशांती मिळत नाही. या अर्थाने जगातील सर्वात श्रीमंत देश भारत आहे आणि ही श्रीमंती संतांनी टिकवली असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीचे पूजन

» श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर आळंदी येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी समाधीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी मंदिर देवस्थानच्यावतीने मुख्यमंत्र्यांचा तुळशीची माळ देऊन सत्कार करण्यात आला.

### इंद्रायणी नदीचा विकास आराखडा

» इंद्रायणी नदीचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. हा आराखडा सर्व मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. लवकरच तो मंजूर करून घेण्यात येईल. याद्वारे पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेसह ३९ गावातील पाणी शुद्ध करून इंद्रायणीत जाईल. इंद्रायणी नदीचे जल स्वच्छ, निर्मळ आणि पुजनीय होईल असा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

---

# 'आयसर पुणे'तील शास्त्रज्ञांची अत्यंत प्रतिष्ठेच्या 'ब्रेकथ्रू' पुरस्कारासाठी निवड

## प्राध्यापक डॉ. सीमा शर्मा, डॉ. सौरभ दुबे त्यांच्या 23 संशोधकांची यंदाच्या 'ब्रेकथ्रू' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतील (IISER) प्राध्यापक डॉ. सीमा शर्मा, डॉ. सौरभ दुबे त्यांच्या २३ संशोधकांची यंदाच्या 'ब्रेकथ्रू' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. दर वर्षी भौतिकशास्त्र, जीवशास्त्र व गणित या शाखांतील क्रांतिकारी संशोधनासाठी ब्रेकथ्रू पुरस्कार दिला जातो. हा विज्ञान क्षेत्रात जागतिक स्तरावर अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो, अशी माहिती आयसरने प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली आहे

मिळालेल्या माहितीनूसार, प्रा. शर्मा आणि प्रा. दुबे हे कॉम्पॅक्ट म्युऑन सोलिनॉयड (सीएमएस) या आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रकल्पाचे सदस्य आहेत. सीएमएस हा प्रयोग वैज्ञानिक इतिहासातील सर्वात व्यापक आंतरराष्ट्रीय संशोधन उपक्रमांपैकी एक आहे. त्यात ५४ देशांतील २४१ संस्थांमधून सुमारे ५,५०० कण भौतिकशास्त्रज्ञ, अभियंते, तंत्रज्ञ, विद्यार्थी आणि सहायक कर्मचारी सहभागी आहेत. यंदा सीएमएससह लार्ज हायड्रोजन कोलायडर प्रकल्पांतर्गत ॲलिस, ॲटलास आणि एलएचसीबी-सीईआरएनच्या या आंतरराष्ट्रीय सहयोग गटांनाही ब्रेकथ्रू पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सीईआरएन ही संस्था स्वित्झर्लंडमधील जीनिव्हा येथे कार्यरत आहे.




आयसरने दिलेल्या माहितीनुसार, दर वर्षी भौतिकशास्त्र, जीवशास्त्र व गणित या शाखांतील क्रांतिकारी संशोधनासाठी ब्रेकथ्रू पुरस्कार दिला जातो. जगभरातील हजारो संशोधकांचे सहयोग गट कणांचे मूलभूत स्वरूप समजून घेणे, नव्या कणांचा शोध घेणे आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी कार्यरत आहेत. त्यात आयसर पुणेतील सीएमएस गटातील सक्रिय सदस्य म्हणून प्रा. शर्मा आणि प्रा. दुबे यांच्या संशोधन गटातील इतर सहकाऱ्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यात आयसर पुणेचे काही माजी विद्यार्थीही आहेत. त्यांपैकी काहींनी सीएमएस गटात त्यांचे पदव्युत्तर संशोधन पूर्ण केले, तर काही जण सध्या इतर मोठ्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये संशोधन करत आहेत. प्रा. दुबे यांचे संशोधन प्रमाणित प्रारूपापलीकडे पदार्थविज्ञान (बियॉंड स्टँडर्ड मॉडेल फिजिक्स) या क्षेत्रात केंद्रित आहे, तर प्रा. शर्मा यांचा गट कृष्ण पदार्थ, पदार्थ-प्रतिपदार्थ असमतोल अशा विषयांत कार्यरत आहे.

### यांची पुरस्कारासाठी निवड

» प्राध्यापक डॉ. सीमा शर्मा, डॉ. सौरभ दुबे, शुभांशू चौहान, प्रचुर्ज्य हजारिका, विनय हेगडे, भूमिका कंसल, अंशुल कपूर, कुणाल कोठेकर, अर्णब लाहा, शुभम पांडे, आदिती राणे, अदिती राणे, अलंकार, कुमार यश वैश, प्राची आत्मसिद्धा, आयरीन दत्ता, दिव्या गडकरी, निरामय गोगटे, साई नेहा संतपूर, अभिजित गंद्रकोटा, प्रशम जैन, मुरली कार्तिक मौर्य, नुकुलसिंह परमार, श्रीलक्ष्मी सिंधू, मंगेश सोनवणे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली आहे.

# पिंपरी-चिंचवड पालिकेच्या पाणीबचतीसाठी तातडीच्या उपाययोजना

**पावसाळ्यापर्यंत शुद्ध पाणी देण्यासाठी महापालिकेच्या वतीने महत्त्वाच्या उपाय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढू लागली आहे. पावसाळ्यापर्यंत शुद्ध पाणी देण्यासाठी महापालिकेच्या वतीने महत्त्वाच्या उपाय योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय म्हणजे, पाणीपुरवठा विभागाला उशिरा सुचलेले शहाणपण आहे, अशी चर्चा शहरात आहे.

सध्या शहर संभाव्य पाणीटंचाईचा सामना करत आहे. जुलैपर्यंत पुरेल एवढाच पाणीसाठा धरणात उपलब्ध आहे. उन्हामुळे बोअरवेलचे पाणी आटले आहे. त्याचा फायदा घेत टँकर लॉबीने दर वाढविले आहेत. सोसायट्यामधील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बहुतांशी ठिकाणी बंद आहे. अनधिकृत नळ कनेक्शन वाढले आहेत. शुद्ध पाण्याचा गाड्या धुण्यासाठी वापर केला जात आहे. या सर्व गोष्टीना आळा घालण्यासाठी महत्त्वाच्या उपाय योजना राबविण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या २०११ साली १७ लाख होती तीच आज ३५ लाख झाली आहे. परंतु, पाणीपुरवठा फक्त ३५ टक्केने वाढला आहे. तरीदेखील महापालिकेच्या वतीने नागरिकांना वर्षभर सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे. परंतु, अनधिकृत पाणी वापरामुळे उन्हाळ्याच्या दिवसात पाणीपुरवठ्याचा अडथळा निर्माण होतो यासाठी महापालिके कडून महत्त्वाच्या उपाय योजना आखण्यात आल्या आहेत. जसे पंपाद्वारे थेट लाईनवरील पाणी खेचण्यास बंदी व असे आढळल्यास कारवाई, अनधिकृत कनेक्शन वर कडक कारवाई, रेन वॉटर हार्वेस्टिंगचीदेखभाल करणे, नवीन पाणीपुरवठा कनेक्शनसाठी पुढील दोन महिने स्थगिती, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नसणाऱ्या व्यापारी वसाहती मधील पाणीपुरवठा थांबविण्याची शक्यता, गाड्या, रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.



### पाणी नासाडीवर लावणार रोख

» महानगरपालिकेच्या पाईप लाईनवर थेट पंप लावून पाणी खेचणाऱ्या विरोधात कारवाई होणार, कारवाई नंतर पाणी खेचताना दिसल्यास नळ कनेक्शन बंद करणार, बांधकाम साईट्स, कार वॉशिंग सेंटर, यांची तपासणी होणार आहे. सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या माध्यमातून निर्मित पाण्याचा वापर न करणाऱ्या मॉल व सोसायट्यावर कारवाई होणार, पिण्याच्या पाण्याने गाडी व रस्ते धुणाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात येणार आहे.

### पालिकेच्या उपाय योजना

- » सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यात यावी.
- » तेच पाणी उद्यानात ठिबक सिंचनाद्वारे द्यावे
- » रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था दरवर्षी तपासावी.
- » पाण्याच्या टाक्यांचे गळती तपासावी, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नसणाऱ्या जुन्या सोसायट्यांमध्ये ग्रे वॉटर प्लॅट बसवावा हॉटेल, मॉल, शाळा यांनी नळाला अरेटर बसवावा त्यामुळे पाण्याची ५० टक्के बचत होते.
- » सोसायटी धारकांनी सोसायटीमधील पाण्याचे ऑडिट करावे. अनधिकृत नळ जोडणी व पाण्याच्या गैरवापराची माहिती पालिकेला द्यावी, पाण्याचा टँकर खरेदी पाण्याची गुणवत्ता तपासावी.

### हे करू नका..

- » पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करू नका.
- » सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बंद ठेवू नका.
- » अनधिकृत नळ कनेक्शन घेऊ नका.
- » वीज पंपाद्वारे थेट लाईनवरील पाणी खेचू नका.
- » गाड्या धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये.

> शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणी नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, प्रभारी आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# 'नकोशी' शाळा बनली 'हवीहवीशी', कासारवाडीत महापालिकेची अत्याधुनिक शाळा साकार

**श्री छत्रपती शाहू महाराज महापालिका शाळा आता जुन्या ओळखीला मागे टाकत आधुनिकतेचा नवा आदर्श ठरत आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

कासारवाडी येथील श्री छत्रपती शाहू महाराज महापालिका शाळा आता जुन्या ओळखीला मागे टाकत आधुनिकतेचा नवा आदर्श ठरत आहे. एकेकाळी मंदिराच्या व पोस्टाच्या खोल्यांमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आता पाच मजली, सुसज्ज इमारतीत शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.

४४ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या शाळेला माजी आमदार अण्णासाहेब मगर यांनी संरक्षण खात्याकडून दोन एकर जागा मिळवून दिली होती. त्यावर उभ्या केलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या शाळेची जागा आता भव्य शैक्षणिक संकुलात रूपांतरित झाली आहे. माजी नगरसेवक शाम लांडे यांच्या प्रयत्नातून जुन्या इमारतीचे पुनर्बांधणी काम हाती घेण्यात आले.

महापालिकेच्या स्थापत्य विभागाच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या या शाळेत २४ वर्ग खोल्या, ऑॅडिटोरीयम, वाचनालय, स्वतंत्र चित्रकला, नृत्य, हस्तकला हॉल, तसेच संगणक व विज्ञान विषयांच्या प्रयोगशाळा आहेत. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे, आग प्रतिबंधक यंत्रणा, स्वच्छ शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

कासारवाडी येथील श्री छत्रपती शाहू महाराज महापालिका शाळा आता जुन्या ओळखीला मागे टाकत आधुनिकतेचा नवा आदर्श ठरत आहे या इमारतीची रचना विद्यार्थी-केंद्रित असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी आहे. परिसरात माता जिजाऊ व बाल शिवाजी यांच्या पुतळ्यांच्या माध्यमातून प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यात आले आहे. सुमारे २ कोटी २५ लाखांच्या खर्चातून साकारलेली ही शाळा भविष्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मानदंड ठरणार आहे, असा विश्वास स्थानिक प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.



> शाळेच्या सुसज्ज इमारतीमधून सर्व सामान्य विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेता येणार आहे. महापालिकेच्या अशा अत्याधुनिक इमारती साकारणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात उत्साह निर्माण करण्यासारखे आहे. इतर इमारतही पालिकेच्या शाळा अशा सुसज्ज करण्याचा प्रयत्न राहील. गरिबातील गरीब लोकांना चांगल्या शाळा व चांगले ज्ञान मिळणार आहे.
>
> **- सतीश वाघमारे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग 'ह' क्षेत्रीय कार्यालय**

# जलसंपदा विभागाची महामंडळांना स्वायत्ता; जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

## जलसंपदा विभागाच्या महामंडळांना स्वायत्त करण्यात येणार असून, निधी उभारणीसाठी महामंडळांना अधिकार देण्यात येणार आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील जलसंपदा विभागाच्या महामंडळांना स्वायत्त करण्यात येणार असून, निधी उभारणीसाठी महामंडळांना अधिकार देण्यात येणार आहेत. त्यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.

जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन भवन येथे नियामक मंडळाची बैठक गुरुवारी झाली. त्यामध्ये झालेल्या निर्णयांची माहिती विखे-पाटील यांनी पत्रकारांना दिली.

जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणमंत कुणाले, प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता हणुमंत धुमाळ यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

'जलसंपदा विभागाची कार्यरत असलेली महामंडळे निधीसाठी राज्य सरकारवर अवलंबून आहेत. महामंडळांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता जाणवत आहे. ही महामंडळे स्वायत्त केल्यास त्यांच्याकडील उपलब्ध साधनांचा वापर करून निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे शक्य होणार आहे. सरकारी अनुदानावरही अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही

'महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, औद्योगिक वसाहती यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर थकीत पाणीपट्टी आहे. ही रक्कम २ हजार २०० कोटींच्या आसपास असून, ती वसूल करण्यात येण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येईल,' असेही राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

धरणांच्या हद्दीतील अतिक्रमणांची संख्या वाढली आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठाही दूषित होत आहे. त्यामुळे यापुढे ही अतिक्रमणे काढण्यात येणार असून, तशी सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना या बैठकीत दिली.

. महामंडळाच्या क्षेत्रात पर्यटन विकास वाढीवरही भर देण्यात येणार असून, त्यासाठी निधी उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे विखे-पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, 'महामंडळे स्वायत्त झाल्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन स्वत: महामंडळांकडून दिले जाईल. महामंडळासाठी वित्तीय सल्लागार समितीही स्थापन करण्यात येणार आहे. तर, बारामती पंचायत समितीला महामंडळाची जागा देण्यासंदर्भातही निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून, यापुढे अशा संस्थांना जागा देताना रेडिरेकनरच्या दरानुसार रक्कम आकारण्यात येणार आहे.

जलसंपदा विभागाच्या महामंडळांना स्वायत्त करण्यात येणार असून, निधी उभारणीसाठी महामंडळांना अधिकार देण्यात येणार आहेत. त्यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.



### थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी स्वतंत्र यंत्रणा

» महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, औद्योगिक वसाहती यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर थकीत पाणीपट्टी आहे. ही रक्कम २ हजार २०० कोटींच्या आसपास असून, ती वसूल करण्यात येण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येईल,' असेही राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांना ८० टक्के पाण्यावर पुर्नप्रक्रिया करणे आवश्यक आहे.

### धरणांच्या हद्दीतील अतिक्रमणांवर कारवाई

» धरणांच्या हद्दीतील अतिक्रमणांची संख्या वाढली आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठाही दूषित होत आहे. त्यामुळे यापुढे ही अतिक्रमणे काढण्यात येणार असून, तशी सूचना राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना या बैठकीत दिली.

### पवार एकत्र येण्याबाबतही भाष्य

» दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले तर आनंद आहे. त्यासंदर्भात कोणताही आक्षेप नाही, असे विखे पाटील यांनी सांगितले. तर, दोन्ही पक्ष एकत्र आले तर कार्यकर्त्यांची होरपळ होणार नाही आणि सर्वांना न्याय मिळेल, असे जानकर यांनी सांगितले.

# पुरंदर तालुक्यात बेकायदा प्लॉटिंगचे पेव !

## पुरंदर तालुक्यात प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे येथील जमिनीला सोन्याचे भाव आले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे येथील जमिनीला सोन्याचे भाव आले आहेत. सासवड, जेजुरी शहराच्या चारही बाजूंच्या 10 ते 15 किलोमीटर अंतरावरील ग्रामपंचायत हद्दीत जोर धरलेले प्लॉटिंग धडाक्यात विकण्याचा प्रकार सुरू असल्याने कोट्यवधी रुपयांच्या फसवणुकीचा धोका निर्माण झाला आहे. परंतु, मोठ्या राजकीय दबावामुळे प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे.

सासवड परिसरातील गावांच्या हद्दीत जमिनीचे रहिवास अथवा इतर कारणांकरिता विकसित करण्यासाठी संबंधित जागेचे रेखांकन मंजूर करणे, संबंधित जमिनीच्या अकृषिक वापरासाठी परवानगी घेणे आणि त्यानंतर जमिनीवर विकास करणे अपेक्षित असते. परंतु, अनेक प्लॉटिंग अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत प्रशासन गप्प का? हे न उलगडणारे कोडे आहे.

पुरंदर तालुक्यात नैसर्गिक स्रोत असणारे ओढे हे मुरूम, माती, दगड टाकून प्रवाहांना अडथळा ठरतील अशा रीतीने बुजविण्यात येऊन बेकायदा प्लॉट पाहून विक्री करण्याचा सपाटा काही बड्या व धनदांडग्यांनी सुरू केला आहे. शेतजमिनीचे बेकायदा एका एका गुंठ्याचे प्लॉट पाडून विक्री होत आहे. यात महसूल विभागातील मंडळी देखील कायद्यातील पळवाटा शोधून अशा नोंदी सातबारावर घेत आहेत. भाजप व शिवसेना महायुतीचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑक्टोबर 2016 मध्ये पुण्यासाठी पुरंदर तालुक्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प उभारण्याची घोषणा केली.



### बेकायदा प्लॉटिंगला प्रशासनाची साथ

» सासवड भागातील प्लॉटिंग दलालांनी प्रशासनातील अनेकांना हाताशी धरून ओढ्यालगत जमीन, डोंगर, टेकड्या, वादावादी व वतनी, इनामी जमिनींचे प्लॉटिंग करणे चालविले आहे. अशिक्षित व गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने लाटून तो प्लॉट चौपट, पाचपट दराने बेकायदेशीरपणे विक्री केला जात आहे आणि या दलालांना महसूल विभागातील मंडळी देखील लालसेपोटी कायद्यातील पळवाटा दाखवत अशा नोंदी सातबारावर घेत आहेत

### जमिनी धनाढ्यांना विकून एजंटांनी कमावले पैसे

» मुंबई, पुणे येथील धनाढ्य लोकांनी शेतकऱ्यांच्या मजबुरीचा फायदा घेत कवडीमोल दराने जमिनी घेऊन त्यावर गुंठेवारी केली. सध्या गावागावातच जमिनीची खरेदी-विक्री करणारे एजंट तयार झाले. कमी कष्टात पैसे कमविण्यासाठी आपल्याच गावातील शेकडो एकर जमिनी धनाढ्य लोकांना विकून पैसे कमावले.